नियमित दिवाणी मुकदमा क्र.६०/२०१६
निशाण क्र. १३४ लगत

प्रतिवादी क्र. २, ६ ते ११ यांना पुकारले असता गैरहजर. सबब उलटतपास नाही.

**उलट तपास वादी यांचा प्रतिवादी क्र. १ तर्फे विधिज्ञ श्री. एल.एल. नाथगोसावी, यांचेमार्फत शपथेवर सुरु—**

११. माझा जन्म दि. ०२/०८/१९५९ रोजीचा आहे. प्रतिवादी क्र. १ माझा मोठा भाउ आहे. प्रतिवादी क्र. १ चा जन्म १९४७ सालचा आहे. गिरजाबाई हिचा मृत्यू दि. ११/०७/१९८२ रोजी झाला आहे. माझ्या आईचा मृत्यू दि. २७/०७/१९८० रोजी झाला आहे. माझी मावशी सुलोचना हिचा मृत्यू दि. २०/०७/१९९५ रोजी झाला आहे. गिरजाबाईच्या पतीचे नाव शंकर होते. शंकरचा मृत्यू १९५९ साली झाला आहे. माझी आई मयत झाली त्यावेळी तिचे वय अंदाजे ६० ते ६५ वर्षे होते. सुलोचना मयत झाली त्यावेळी तिचे वय किती होते हे मला सांगता येणार नाही. साक्षीदार सांगतात की, माझ्या आईच्यात आणि सुलोचनामध्ये २ वर्षाचा फरक होता. माझ्या आईपेक्षा सुलोचना मोठी होती. माझ्या आईचे लग्नानंतरचे गाव भिरवंडे, ता.कणकवली होते आणि सुलोचनाचे लग्नानंतरचे गाव हरकुळ, ता. कणकवली होते. माझी आई लिलावती हिचे लग्न १९३८ साली झाले आहे हे मला सांगता येणार नाही. सुलोचनाचे लग्न १९४१ साली झाल्याचे मला सांगता येणार नाही.

१२. माझे सातवीपर्यंत शिक्षण मुंबईला झाले आहे. त्यापुढे मी शिकलेलो नाही. माझे कायमचे वास्तव्य मुंबईला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी कायमपणे गावी राहीला आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ जयवंत कायमपणे आजोळी राहायला होते. साक्षीदार सांगतात की, ते दुसरी ते तिसरीपर्यंत आजोळी राहायला होते त्यावेळी सगळी भावंडे पण होती. हे म्हणणे खरे आहे की, मी आजोळी राहायला नव्हतो.

१३. दावा दाखल केला त्यावेळी मी सातबारा उतारे व फेरफार उतारे पाहिले होते. गिरजाबाईच्या बक्षिसपत्राची माहिती मला २०१६ साली समजली आहे.

प्रश्न — बक्षिसपत्राची माहिती तुम्हाला फेरफारवरून कळाली की अन्य मार्गाने ?

उत्तर — अन्य मार्गाने मला बक्षिसपत्राची माहिती कळाली.

मी दावा दाखल करण्यापूर्वी दावा मिळकतीचे महसूल कागद काढले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ पोस्टामध्ये कामास होते. माझ्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र. १ कुठेच कामास नव्हते. मी आणि प्रतिवादी क्र. १ १९८० सालापर्यंत एकत्रीत राहायला होतो. आम्हा दोघांचे संबंध २००० सालापर्यंत चांगले होते. बक्षिसपत्र मी काढून पाहिलेले नाही. प्रतिवादी क्र. १ ने या दाव्याच्या कामी मूळ बक्षिसपत्र दाखल केले आहे ते मी पाहिलेले नाही. दावा मिळकती हडपीडला कोठे आहेत हे मला माहिती आहे. दावा मिळकतीचे सर्वे क्रमांक व हिस्सा क्रमांक मला सांगता येणार नाही. दावा मिळकतीच्या चतु:सीमा मला माहिती आहेत. साक्षीदार पुन्हा सांगतात की, दावा मिळकतीच्या चतु:सीमा मला सांगता येणार नाहीत. दावा मिळकतीपैकी कोणत्या मिळकतीत सागाची झाडे होती हे मला सांगता येणार नाही. माझी आजी गिरजाबाई हिचे हडपीड गावी घर होते, ते घर तिने बांधले नसून आजोबांनी बांधले आहे. मी म्हणत असलेली सागाची झाडे पाहिली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या झाडांचे वय साधारणत: ३० ते २५ वर्षे होती. हे म्हणणे खरे नाही की, ती झाडे गिरजाबाईने स्वत: लावलेली होती. दावा मिळकतीबाबत पूर्वी कोर्टात दावा दाखल नव्हता. माझे आजोबा शंकरला भाउ होते. वाटपाने त्या भावांचा हिस्सा वेगळा झाला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकती वाटपाने गिरजाबाईस मिळालेल्या आहेत. दावा मिळकतीमधील फेरफार क्र. ११०२ मी पाहिला आहे.

सकाळसत्राची वेळ संपल्याने उलटतपास दुपारसत्रापर्यंत तहकूब.

श्रवणोत्तर स्विकृत

दि.११/०३/२०२०.

दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड

Digitally signed by Balkrishna Rajaram Patil
Date: 2020.03.12 11:33:02 +0530

.

नियमित दिवाणी मुकदमा क्र.६०/२०१६
निशाण क्र. १३४ लगत

**पुढील उलट तपास वादी यांचा प्रतिवादी क्र. १ तर्फे विधिज्ञ श्री. एल.एल.नाथगोसावी, यांचेमार्फत शपथेवर सुरु—**

१४. प्रश्न — फेरफार क्र. ११०२ मध्ये गिरजाबाईने बक्षीसपत्राने मिळकती प्रतिवादी क्र. १ च्या नावे दिल्या अशी नोंद होती ?

उत्तर — नोंद आहे पण खोटी करून घेतली आहे.

हे म्हणणे खरे आहे की, शंकर मयत झाल्यावर त्याच्या मिळकतींचा कब्जा गिरजाबाईकडे आला. सुलोचना व माझी आई मुंबई येथे मयत झाल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सुलोचना व माझी आई मयत होईपर्यंत मुंबई येथेच राहिल्या होत्या. माझी आई व सुलोचना चा जन्म १९५६ पूर्वीचा आहे याबाबत मला माहिती नाही.

न्यायालयाची कामकाजाची वेळ संपल्याने उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.

श्रवणोत्तर स्विकृत

दि.११/०३/२०२०.

दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड

Digitally signed by Balkrishna Rajaram Patil
Date: 2020.03.12 11:33:08 +0530